महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (२), पुणे यांचे कार्यालय
शुक्रवार पेठ, पुणे

जा.क्र.उनि(२)/गृह/७५(५) आदेश/स्टेट बॅंक नगर सुस रोड प्रकल्प हौ./२०२३ | २७९२ दिनांक : ०५/१२/२०२३
**रजिस्टर पोस्ट पावतीसह**

## (महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७५ (५) अन्वये आदेश)

**वाचले -**

या कार्यालयाची महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७५(५) अन्वये दिनांक १६/१०/२०२३ रोजीची नोटीस.

ज्याअर्थी, स्टेट बॅंक नगर सूस रोड प्रकल्प हो सोसा.१४०/३,सुस रोड, पाषाण, पुणे २१ ही नोंदणीकृत सहकारी गृहरचना संस्था असून सदरची संस्था या कार्यालयाच्या वैधानिक कार्यकक्षेत येते.आणि...

ज्याअर्थी, सदर संस्थेचे कामकाज हे महाराष्ट्र सहकारी संस्था, अधिनियम १९६० व त्या खालील नियम १९६१, संस्थेचे उपविधी तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेली परिपत्रके यानुसार करणे संस्थेच्या व्यवस्थापक समितीवर बंधनकारक आहे. आणि...

ज्याअर्थी, श्री. उमेश शिंदे, प्रमाणित लेखाप्रिक्षक तथा प्राधिकृत अधिकारी यांनी दाखल केलेल्या त्यांचे अहवालामध्ये नमूद केले आहे की, " वर्ष २००३, २००७, २००८, २००९, २०१०, २०१४, २०१५ या वर्षाच्या आर्थिक सर्वसाधारण सभांची सुचनापत्रे आणि सभांची इतिवृत्त यांच्या छायांकित प्रती, सभांमध्ये मंजूर झालेले ठराव, मुळ संस्था स्टेट बॅंक नगर हो सासा मर्या., यांच्या त्या त्या वेळेच्या पदाधिका-यांनी दिलेल्या मान्यतांच्या प्रमाणित छायांकीत प्रती, सहकार खात्याकडून संस्थेने आदर्श उपविधी मंजूर केलेली आहे मात्र ज्या सभेत सदरची उपविधी मंजूरीचा ठराव संमत करणेत आला त्या सभेचा वृत्तांत संस्थेच्या दप्तरी नसल्याचे नमूद केलेले आहे. संस्थेस श्री. अनिल जोशी यांनी दिलेल्या पत्रांच्या प्रती, श्री. अनिल जोशी यांनी मागणी केलेल्या कागदपत्रांच्या प्रती संस्थेकडे उपलब्ध नाहीत. संस्थेची नोंदणी दिनांक ०५/०६/२०१५ रोजी झालेली असून संस्था भाग दाखले हे सन २०१९ मध्ये तयार करणेत आलेले आहेत. तत्कालिन पदाधिकारी यांच्या कडून दिनांक २३/०१/२०२३ नंतर आलेल्या नवनिर्वाचित संचालक मंडळाने घेतलेल्या दप्तराची यादी संस्थेने द्यावी असे श्री. अनिल जोशी यांनी मागणी केलेले होते मात्र तशी यादी संस्था दप्तरी नसल्याचे आढळून आले. जानेवारी २०२२ ते एप्रिल २०२३ या काळातील संस्था समितीच्या सभांचा तपशील हा सन २०२२-२३ चे लेखापरिक्षण करीता लेखापरिक्षकांना देण्यात आलेला असल्याने सदर दप्तर उपलब्ध करुन देण्यात आलेले नाही. ज्याअर्थी, सन २०१५ ते सन २०२३ या काळात संस्थेने आयोजित केलेल्या वार्षीक सर्वसाधारण सभा आणि विशेष सर्वसाधारण सभा यांच्या इतीवृत्तांच्या प्रती संस्थेने श्री. अनिल जोशी व प्राधिकृत अधिकारी यांना उपलब्ध करुन दिलेल्या नाहीत . संस्थेत सीसीटीव्ही बसविणेबाबत कार्यकारी समितीची नोटीस , इतिवृत्त, मुळ ठराव, जमा केलेले पेसे खर्च केल्याचे विवरण संस्थेने उपलब्ध करुन दिलेले नाही. संस्थेचा सन २०२०-२१ चा दोषदुरुस्ती अहवालाची प्रत संस्थेने उपलब्ध करुन दिली मात्र सदर अहवाल हा मराठी भाषेत नाही व त्यावर लेखापरिक्षकाची स्वाक्षरी नाही. सन २०१५ ते २०२२ पर्यंतचे बॅक स्टेटमेंट देण्यात आले. संस्थेतील ई आणि एफ़ इमारतीत केलेल्या बांधकाम बाबत चे ठराव, बांधकामासाठी आलेल्या खर्चा बाबत कंत्राटदारांच्या कडून आलेले ३ प्रस्ताव, निवड करण्यात आलेले कंत्राटदारांच्या बाबतीत बेठकीचा ठराव, सदर विषयीचा वार्षीक सर्वसाधारण सभा अहवाल, सभासदांकडून जमविलेले पेसे, त्याचा

केलेला वापर, वास्तु विशारद साठीचा खर्च, श्री. अनिल जोशी यांच्या तक्रार अर्जांना संस्थेने दिलेली उत्तर संस्थेने उपलब्ध करुन दिलेले नाही. संस्थेने जमाखर्च लिहीणे या कामासाठी केलेला ठराव, सभेचे इतिवृत्त, सन २०१५ -२०२२ या काळात विशिष्ट कामासाठी संस्थेने केलेल्या खर्चाचा ठराव, नोटीस, व्हावचर्स व दिलेले चेक संस्थेने उपलब्ध करुन दिलेले नाही." याप्रमाणे अहवाल उमेश शिंदे प्रमाणित लेखापरिक्षक यांनी सादर केलेले आहे.

ज्याअर्थी, संस्थेचे सभासद श्री. अनिल जोशी यांच्या विविध तक्रारीचे अनुषंगाने या कार्यालयाने श्री. ज्ञानेश्वर प्र. टेकवडे, विशेष लेखापरिक्षक वर्ग-२, सहकारी संस्था (दुग्ध ), पुणे यांची महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ मधील कलम ८९ (अ) अन्वये तपासणी अधिकारी म्हणून नियुक्ती केली होती. श्री. टेकवडे यांनी त्यांचा तपासणी अहवाल या कार्यालयास सादर केलेला आहे. सदर तपासणी अहवालानुसार " संस्थेने दिनांक २९/०३/२०२१ ठराव क्रमंक ३ अन्वये सन २०२०-२१ ते २०२२-२३ या तीन वर्षासाठी श्री. एम. आर. सलगर, प्रमाणित लेखापरिक्षक यांची नेमणूक केलेली आहे. कायद्यात नमूद असलेनुसार एका वेळी एकाच वर्षासाठी म्हणजे प्रत्येक वार्षिक सभेत लेखापरिक्षक नेमणूक करणे आवश्यक आहे व संबधीत लेखापरीक्षकाची संमती घेवून वार्षीक विवरणपत्रे निबंधकाकडे सादर करणे आवश्यक आहे. संस्थेने सन २०१५-१६ ते सन २०१९-२० चा दोषदुरुस्ती अहवाल दिनांक २१/१०/२०२१ रोजी एकाच वेळी या कार्यालयाकडे सादर केलेला आहे व सन २०२१-२०२२ चा दोषदुरुस्ती अहवाल दिनांक ०७/०२/२०२३ रोजी या कार्यालयाकडे सादर केलेला आहे. लेखापरिक्षण अहवाल प्राप्त झालेनंतर तीन महिन्याचे आत संबंधीत लेखापरिक्षकाकडे दोष दुरुस्ती अहवाल सादर करणे आवश्यक असून त्याप्रमाणे संस्थेने कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. सन २०१९-२० मधील पार्किंग विक्री रु. २,०२,०००/- बॅक स्टेटमेंटला दिनांक ०२/०४/२०१९ रु. १०२०००/- दिनांक ०३/०५/२०१९ रोजी रुपये ५००००/- व दि. ०४/०६/२०१९ रोजी ५००००/- पासबुकला जमा आहेत. तथापि, सदर रक्कम आर्थिक पत्रकाला कोणत्या हेडला जमा घेतली ? याचा तपशील उपलब्ध झाला नाही. संस्थेचे ठराव नियमानुसार नोंदविण्यात आलेले नाहीत त्याचप्रमाणे वार्षीक सभेत आवश्यक कामकाज केलेले दिसून येत नाही. संस्थेने प्रतिवर्षी वार्षिक सभेत लेखापरिक्षकाची नेमणूक करुन लेखापरिक्षण करुन घेणेएवजी एकाच वेळी तीन वर्षासाठी नेमणूक करुन लेखापरिक्षण करुन घेतले आहे. प्राप्त लेखापरिक्षण अहवालाचे विहीत मुदतीत दोषदुरुस्ती अहवाल संबंधित लेखापरिक्षकाकडे सादर केलेले नाहीत. त्याएवजी मागणी झालेवर निबंधक कार्यालयाकडे सादर केले आहे. []

ज्याअर्थी, या कार्यालयाचे उपरोक्त वाचले अन्वये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७५(५) प्रमाणे संस्थेच्या समिती सदस्यांना ५ वर्षाहुन अधिक नसलेल्या कालावधीसाठी समितीचा सदस्य म्हणून निवडला जाण्यास किंवा राहण्यास अनर्ह आहे असे घोषित का करण्यात येवू नये ? याबाबत उपरोक्त वाचले प्रमाणे नोटीस जारी करण्यात आली होती. आणि,

ज्याअर्थी, सदर नोटीशीचे अनुषंगाने या कार्यालयात दिनांक ३१/१०/२०२३ , दिनांक ०२/११/२०२३, दिनांक ०७/११/२०२३ रोजी सुनावणी घेण्यात आली. सदर सुनावणीचे वेळी संस्थेचे चेअरमन श्रीमती. वेशाली घाग, सेक्रेटरी गणेश शिंदे, खजिनदार संपदा बोकाडे, समिती सदस्य श्री. सुनिल तरटे, श्री. शादाब देशमुख, श्रीमती. अंजली इंगवले, श्री. अभिजीत चिटणीस हे उपस्थित होते.

**जाबदेणार श्रीमती. वेशाली घाग व श्रीमती. संपदा बोकाडे यांचे लेखी म्हणणे-**

१. मा. उपनिबंधकांनी सचिवांच्या निदर्शनास आणून दिले की, सचिव कॉम्पुटरवर स्वतः तयार केलेले लेटरहेड वापरू शकत नाहीत. परंतु दुर्दैवाने हा मुद्दा ऑर्डर शीटमध्ये नोंदवला गेला नाही. म्हणून आम्ही आपल्याला विनंती करतो की, भविष्यात आमचे सर्व मुद्दे रेकॉर्ड केले जावेत.
२. सोसायटीचे माजी सचिव, श्री कुमारधासन यांनी २०१९ मध्ये संपूर्ण प्रभार आणि कार्यालय त्यांच्या उत्तराधिकारीकडे सोपवलेले नाही. खरे म्हणजे, त्यांच्याकडे त्यांच्या वैयक्तिक ताब्यात जास्तीत जास्त कागदपत्रे आणि अधिकृत नोंदी आहेत.
३. श्री. कुमारधासन यांनी अगदी अलीकडेच दिनांक ०२.०९.२०२३ रोजी व्हाट्सअॅपवर आर्थिक वर्ष १५-१६, १६-१७, २०-२१ आणि २१-२२ च्या जनरल लेजरची सॉफ्ट कॉपी दिली आहे. (त्याचा पुरावा आमच्या दिनांक ३०.१०.२०१३ च्या पत्रासोबत जोडला आहे). यावरून आजपर्यंत पदभार पूर्णपणे आमच्या हाती आलेला नाही हे

सिद्ध होते. आमची आपणास नम्र विनंती आहे कि मा.उपनिबंधक, पुणे शहर (२) यांनी नमूद केल्याप्रमाणे, वेळेत पूर्ण कार्यभार सोपवल्याबद्दल श्री. कुमारपासन व्यवस् कठोर कारवाई करावी.

४. चाचणी लेखापरीक्षणासाठी मा. उप निबंधक पुणे शहर (२) यांनी लेखापरीक्षकाची नियुक्ती केली आहे आणि सोसायटीने सर्व आवश्यक कागदपत्रे सौ. भारती जोशी यांनी मागितलेल्या कागदपत्रांसह चाचणी लेखापरीक्षण करणाऱ्या अधिकाऱ्याला दयायची होती. उपलब्ध सर्व कागदपत्रे अध्यक्षांनी लेखापरीक्षकांना प्रत्यक्ष देण्यासाठी सचिव श्री. शिंदे यांच्याकडे सुपूर्द केली. श्री. शिंदे यांनी हे काम केले नाही आणि आता या कामासाठी अध्यक्ष व कोषाध्यक्ष यांना ते जबाबदार धरत आहे जे अत्यंत अतार्किक व चुकीचे आहे.

५. सचिवांनी मान्य केले आहे की, सोसायटीचे उपविधी आजपर्यंत मंजूर झालेले नाहीत आणि ते मंजूर नसलेले उपविधी लागू करत आहेत. आमची आपणास नम्र विनंती आहे की, कृपया DDR च्या आदेशानुसार आमच्या स्वतंत्र सोसायटीच्या स्थापनेनंतर २०१५ मध्ये या उपविधींना मंजूरी मिळवून न देणारे माजी सचिव श्री. कुमारधासन के. यांच्यावर आवश्यक कारवाई करावी..

६. अध्यक्ष आणि कोषाध्यक्ष आपल्याला माहिती आणि कागदपत्रे देत नसल्याचे नमूद केले आहे. तसेच या दोन पदाधिकाऱ्यांवर आवश्यक कारवाई करण्याची विनंती केली आहे. येथे आम्ही सूचित करू इच्छितो की, सोसायटीच्या सेक्रेटरीने सर्व आवश्यक कार्ये पार पाडण्यासाठी प्रमुख भूमिका बजावणे आणि व्यवस्थापकीय समितीच्या सर्व सदस्यांना सोबत घेऊन जाणे आवश्यक आहे. सेक्रेटरी स्वतः मान्य करत आहेत की ते त्यांच्या सेक्रेटरी पदाचे कर्तव्य पार पाडत नाहीत, ही अत्यंत गंभीर बाब आहे. आमची आपणास नम्र विनंती आहे की, कृपया त्यांच्याविरुद्ध उपविधीनुसार आवश्यक कारवाई करावी. आम्ही मांडलेल्या वरील मुद्द्यांवरून हे स्पष्ट होते की, सोसायटीच्या बेबनाव परिस्थितीसाठी विद्यमान सचिव पूर्णपणे जबाबदार आहेत. त्यामुळेच सभासदांमध्ये वाद निर्माण होऊ लागले आहेत आणि ते अशा टप्प्यावर पोहोचले आहेत की, त्याचा निर्णय आपल्याच स्तरावर घेतला जाऊ शकतो.

७. मा. महोदया, आम्ही आपल्या हे सुद्धा निदर्शनास आणू इच्छितो की, उपरोक्त पत्रावर सही करणारे सचिव आणि उर्वरित ५ समिती सदस्य दिनांक २८.१०.२०२३ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे सूचनापत्र मिळून सुद्धा सभेस उपस्थित नव्हते. तसेच या सभेपूर्वी दिनांक १४.१०.२०२३ रोजी झालेल्या समितीच्या मासिक सभेला सुद्धा ते अनुपस्थितीत होते. तसेच आर्थिक वर्ष २१-२२ साठी दिनांक ११.१२.२०२२ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे सूचनापत्र मिळून सुद्धा श्रीमती अंजली इंगवले, श्री. शादाब देशमुख आणि श्री. दादू सोनावणे हे व्यवस्थापकीय समिती सदस्य सभेस प्रत्यक्ष हजर नव्हते. वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित उपस्थित राहणे हे समिती सदस्याचे आद्य कर्तव्य असूनसुद्धा कुठलीही लेखी परवानगी न घेता अनुपस्थित राहून या समिती सदस्यांनी आपल्या कर्तव्यात कसूर केली आहे, हे आम्ही आपल्या निदर्शनास आणू इच्छितो.

८. आम्ही मांडलेल्या वरील मुद्द्यांचा सर्वांगीण विचार करून योग्य तो निर्णय देण्यात यावा, ही विनंती.

**संस्थेचे सचिव श्री. गणेश शिंदे व इतर ५ समिती सदस्य यांचे म्हणणे-**

१. संस्थेचे संचालक मंडळाची निवडणूक होऊन आम्ही नव्याने निवडून आलेले असून संस्थेचे अध्यक्ष व खजिनदार हे पूर्वीपासून संस्थेचे अध्यक्ष व खजिनदार म्हणून कामकाज पहात आहेत व संस्थेचे संपूर्ण दप्तराचा ताबा अध्यक्ष यांचेकडेच आहे. तसेच संस्थेचे सभासद अर्जदार श्री. अनिल जोशी यांनी मागणी केलेली कागदपत्रे त्यांना उपलब्ध करून देणेस संस्थेचे माजी व वर्तमान अध्यक्ष वैशाली घाग हे त्यांच्या कर्तव्यात कसूरी करत आहेत व संचालक मंडळास दप्तर देणेसटाळाटाळ करत आहेत.

२. संस्थेने सहकार विभागाकडून मंजूर केलेल्या उपविधी संस्थेचे वार्षिक सभेत ठराव करून मंजूर केला नसला तरी तो संस्थेने लागू केला आहे व त्यानुसार संस्थेची निवडणूक झालेली आहे व इतर कामकाज चालू आहे.अर्जदार यांनी मुद्दा क्र. ४ अन्वये प्रमाणित लेखापरिक्षक, प्राधिकृत अधिकारी यांचे लेखापरिक्षण स्वतः अध्यक्ष यांनी केले आहे. त्यासंबंधी काय माहिती याची अध्यक्ष यांनी संचालक मंडळास कल्पना दिलेली नाही, आणि त्यांचा अहवाल संचालक मंडळास वारंवार विनंती करूनदेखील दिलेला नाही. अर्जदार यांनी मुद्रा क्र. ६ अन्वये विशेष लेखापरिक्षक वर्ग-२ यांनी मागविलेली माहिती व कागदपत्रे उपलब्ध करून देण्यात आले परंतु संस्थेचे दप्तर विस्कळीत असल्यामुळे आणि संस्थेचे दप्तर व कपाटाच्या चाव्या निवडणूक झाल्यापासून अध्यक्ष यांचेकडे असल्याने काही कागदपत्रे उपलब्ध करून देता आली नाही व संचालक मंडळास कल्पना दिलेली नाही. त्यामुळे सदर माहिती काय आहे आणि काही कागदपत्रे उपलब्ध नसल्यास आम्हाला माहिती नाही तसेच सदर माहिती मागील संचालक मंडळाचे कार्यकारणीतील असल्यामुळे त्यास आम्हाला जबाबदार धरण्यात येवून नये.

३. तक्रारदार यांनी मागणी केलेल्या सर्व माहित्या या संस्थेचे पूर्वीचे संचालक मंडळाच्या कार्यकाळातील असून त्यास अध्यक्ष व खजिनदार वगळता नव्याने निवडून आलेले संचालक मंडळास जबाबदार धरणे योग्य राहणार नाही.संस्थेचे अध्यक्ष व खजिनदार हे संस्थेचे इतर संचालकांना संस्थेचे कामकाजाबाबत आवश्यक माहिती तपशील उपलब्ध करून देत नसलेवरून इतर संचालकांनी त्यांचेवर अविश्वास ठराव आणणेबाबत व त्यांचे नियमबाह्य व बेकायदेशीर कामकाजाबाबत तक्रार अर्ज दि. १४/०९/२०२३, १८/०९/२०२३, २४/०९/२०२३, ०३/१०/२०२३ व १६/१०/२०२३ रोजी पत्राद्वारे आपल्या कार्यालयाकडे विनंती करण्यात आली आहे. याबाबत प्रथम प्राधान्याने कार्यवाही व्हावी ही विनंती. संचालक मंडळ आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, संस्थेचे अध्यक्ष व खजिनदार यांनी सन २०२२-२३ चे लेखापरिक्षण हे परस्पर जबाबदारी घेवून करून घेतले आहे. त्या लेखापरिक्षणात अनेक त्रुटी आहेत व त्यांनी लेखापरिक्षण अहवाल संचालक मंडळाच्या कुठल्याही समिती सभेत दिला नाही व मान्यता घेतली नाही. तो वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये दि.३०/९/२०२३ रोजी सर्वानुमताने अमान्य करण्यात आलेला आहे. या संदर्भात संस्थेचे सभासद् श्री. अनिल जोशी यांनी आपल्या कार्यालयास तक्रार अर्ज दि. १३/१०/२०२३ अन्वये सूचित केले आहे.

उपनिबंधक सहकारी संस्था ★ पुणे शहर (२) पुणे

४. आमचे संस्थेचे संचालक मंडळ निवडणूक दि. २३/०१/२०२२ रोजी झाली असून अध्यक्ष व खजिनदार वगळता सदर संचालक मंडळास, मागील संचालक मंडळाने केलेल्या नियमबाह्य कामकाजाबाबत कार्यवाही करणे न्यायोचित होणार नाही. तरी वरीलप्रमाणे आमच्या खुलाशाचा विचार होवून देण्यात आलेली नोटीस रद्द करण्यात यावी. संस्थेच्या देखभालीसाठी आणि हितासाठी संचालक मंडळास संधी देण्यात यावी, तसेच आमचेवरील तक्रार अर्जाचे विनंतीनुसार आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.

५. आपल्या कार्यालयाची नोटीस जा.क्र. १५१५ दि. १६-१०-२०२३ बाबत अध्यक्ष यांनी कोणताही खुलासा सादर केला नाही. खजिनदार यांनी दिलेल्या पत्राबाबत दप्तर का उपलब्ध करून दिले नाही याचे कोणतेही कारण न देता माजी पदाधिकाऱ्यांवर आरोप करण्यात आले आहे. त्याबाबत आपण योग्य ती कार्यवाही करावी. कार्यकारी समिती दि. २३-१-२०२२ रोजी नियमाप्रमाणे निवडून आलेली आहे. अध्यक्ष आणि खजिनदार आधीच्या समितीच्या कार्यकाळात अध्यक्ष आणि खजिनदार याच पदावर होते. त्यांनी कार्यकारी समितील विश्वासात घेवून संस्थेचे कामकाज करायला पाहिजे होते. परंतु त्यांच्या खुलाशावरून तसे दिसत नाही. अध्यक्ष आणि खजिनदार यांचे माजी पदाधिकाऱ्यांबरोबर वाद आहेत. त्याचा कार्यकारी समितीशी काहीही संबंध नाही आणि ते आज रोजी निलंबीत अध्यक्ष यांच्या सांगण्यावरून कामकाज पाहतात. कार्यकारी समितीला कोणाचाही हस्तक्षेप मान्य नाही त्यामुळेच आम्हाला दप्तर उपलब्ध होत नाही.

६. आम्ही दि. ३१-१०-२०२३ रोजी सुनावणी दरम्यान केलेल्या खुलाशावरून मागील कार्यकारी समितीने केलेल्या नियमबाह्य कामकाजाबाबत आणि सन २०२२-२०२३ च्या कार्यकाळात झालेल्या कसूरीबाबत अध्यक्ष आणि खजिनदार जबाबदार आहेत आणि त्यांना वगळता इतर कार्यकारी समितीचे सदस्य यांना जबाबदार धरण्यात येवू नये ही विनंती.

७. अध्यक्ष आणि खजिनदार यांनी कार्यकारी समिती विसर्जित करण्याचा निर्णय घेतला आहे. परंतु त्याचे कारण दिलेले नाही आणि कार्यकारी समिती रितसर निवडणूक होवून संस्थेने बहुमताने निवडून दिलेली आहे. तरी वरीलप्रमाणे केलेल्या खुलाशाचा विचार होवून संस्थेच्या हितासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात यावी ही विनंती.

<u>निरिक्षण</u> :-

१. स्टेट बॅक नगर सूस रोड प्रकल्प हो सोसा.१४०/३,सुस रोड, पाषाण, पुणे २१ ही नोंदणीकृत सहकारी गृहरचना संस्था असून तिचा नोंदणी क्रमांक पीएनए/(पीएनए)/एचएसजी(टीसी)/१६९०५/२०१५-२०१६ असा असून सदरची संस्था या कार्यालयाच्या वैधानिक कार्यकक्षेत येते.

२. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७५ (१) मध्ये नमूद असलेनुसार प्रत्येक संस्थेने (वित्तीय वर्ष समाप्त झाल्यापासून चार महिन्यांच्या कालावधीत आपले लेखापरीक्षण पूर्ण करून घेईल आणि अधिनियमात तरतूद केल्याप्रमाणे तिचे कामकाज चालविण्यासाठी वित्तीय वर्ष संपल्यानंतर सहा महिन्यांच्या कालावधीच्या आत आपल्या सदस्यांची अधिमंडळाची वार्षिक बैठक बोलावील). परंतू, स्टेट बॅक नगर सूस रोड प्रकल्प हो सोसा.१४०/३,सुस रोड, पाषाण, पुणे २१ या संस्थेने सदरप्रमाणे कार्यवाही केलेली दिसून येत नाही.

३. संस्थेने वार्षिक सर्वसाधारण सभेपुढे लेखापरिक्षण अहवाल तसेच तद्अनुषंगीक कामकाजाचा वार्षिक अहवाल चर्चा करुन संमती करिता वार्षिक सभेपुढे मांडलेला नाही. संस्थेचा दोषदुरुस्ती अहवाल विहीत मुदतीत या कार्यालयास सादर केलेला नाही. संस्थेने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७५(५) मधील पोटकलमे (१), (२), (२अ), (३) , (४) चे अनुपालन करणे हे संस्थेचे कर्तव्य असताना त्यांनी " वाजवी सबबी वाचून " उपरिनिर्दिष्ट पोटकलमांचे अनुपालन करण्यात कसुर केलेली दिसून येते.

४. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७५(५) मध्ये नमूद असलेनुसार पोटकलम (१) मध्ये विहित केलेल्या कालावधीत सर्वसाधारण बैठक बोलविण्यात किंवा पोटकलमे (२) (२अ) (३)किंवा (४) यांचे पालन करण्यात कसूर करण्यात आली तर, निबंधकास आदेशाव्दारे अशी सभा बोलविणे किंवा पोटकलमे (२) (२अ) (३)किंवा (४) चे अनुपालन करणे हे ज्या कोणत्याही अधिका-यांचे किंवा समितीच्या सदस्याचे कर्तव्य होते व ज्याने वाजवीसबबी वाचून उपरिनिर्दिष्ट पोटकलमापैकी कोणत्याही पोटकलमाचे अनुपालन करण्यात कसूर केली तो अधिकारी किंवा समितीचा सदस्य उक्त आदेशात निबंधक विनिर्दिष्ट करील अशा पाच वर्षाहून अधिक नसलेल्या कालावधीसाठी अधिकारी म्हणुन किंवा समितीचा सदस्य म्हणून निवडला जाण्यास किंवा राहण्यास अनर्ह आहे, असे जाहिर करता येईल. अशी तरतुद आहे.

५. चेअरमन श्रीमती. घाग व खजिनदार श्रीमती. बोकाडे यांनी संस्थेने केलेल्या कायद्याच्या सदर उल्लंघनाबाबत सेक्रेटरी श्री. शिंदे व माजी सचिव श्री. कुमारधासन हे जबाबदार असल्याबाबत म्हणणे मांडले आहे. तर श्री. शिंदे व इतर ५ समिती सदस्य यांनी संस्थेने केलेल्या कायद्याच्या सदर उल्लंघनाबाबत चेअरमन श्रीमती. घाग व श्री. बोकाडे ह्या जबाबदार असल्याने म्हणणे दाखल केलेले आहे. परंतू, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ (१) नुसार हा अधिनियम , नियम आणि उपविधी यांनुसार प्रस्थापित केलेल्या समितीमध्ये प्रत्येक संस्थेचे व्यवस्थापन निहित असेल व त्या समितीने, हा नियम, अधिनियम आणि उपविधी याअन्वये अनुक्रमे देण्यात येतील किंवा लादण्यात येतील अशा अधिकारांचा वापर केला पाहिजे आणि अशी कर्तव्ये पार पाडली पाहिजेत. कलम ७३ (१अब) नुसार, समितीने तिच्या कालावधीत संस्थेच्या कामकाजाशी संबंधित असे जे निर्णय घेतले असतील, अशा सर्व निर्णयांसाठी समितीचे सदस्य संयुक्तपणे व पृथकपणे जबाबदार असतील. संस्थेच्या हितास हानी पोहोचविणा-या सर्व कृती व अकृतींना समितीचे सदस्य संयुक्तपणे व पृथकपणे जबाबदार असतील, असे नमूद आहे.

**अनुमान :-**

उपरोक्त निरिक्षणे विचारात घेता, स्टेट बॅंक नगर सूस रोड प्रकल्प सहकारी गृहरचना संस्था मर्या; १४०/३,सुस रोड, पाषाण, पुणे २१ संस्थेच्या विद्यमान व्यवस्थापकीय समिती सदस्यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७५(५) मधील तरतुर्दीचे पालन करण्यात कसूर केली आहे. सबब, यास जबाबदार संस्थेच्या चेअरमन श्रीमती. वेशाली घाग, सचिव श्री. गणेश विठ्ठल शिंदे , खजिनदार श्रीमती. संपदा मिलिंद बोकाडे , व्यवस्थापकीय समिती सदस्य श्री. दादू भिवा सोनवणे, श्री. रुचिर ओमप्रकाश शर्मा, श्री. अभिजीत चिटणीस, श्रीमती. अंजली यशवंत इंगवले, श्रीमती. रुपा नवीन वर्मा, श्री. शादब देशमुख, श्री. सुनिल नाना तरटे हे संस्थेचे पदाधिकारी म्हणून किंवा व्यवस्थापक समिती सदस्य म्हणून निवडले जाण्यास किंवा राहण्यास अनर्ह ठरत आहेत, अशी माझी खात्री झाली असल्याने मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## -: आदेश :-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७५(५) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी, निलम पिंगळे, उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (२), पुणे, स्टेट बॅंक नगर सूस रोड प्रकल्प सहकारी गृहरचना संस्था मर्या; १४०/३,सुस रोड, पाषाण, पुणे २१ या संस्थेचे चेअरमन श्रीमती. वेशाली घाग,सचिव श्री. गणेश विठ्ठल शिंदे , खजिनदार श्रीमती. संपदा मिलिंद बोकाडे , व्यवस्थापकीय समिती सदस्य श्री. दादू भिवा सोनवणे, श्री. रुचिर ओमप्रकाश शर्मा, श्री. अभिजीत चिटणीस, श्रीमती. अंजली यशवंत इंगवले, श्रीमती. रुपा नवीन वर्मा, श्री. शादब देशमुख, श्री. सुनिल नाना तरटे यांना संस्थेचे पदाधिकारी म्हणून किंवा व्यवस्थापन समिती सदस्य म्हणून निवडले जाण्यास किंवा पदाधिकारी म्हणून राहण्यास या दिनांकापासून पुढील पाच वर्षांसाठी अनर्ह घोषीत करीत आहे. वर नमूद पदाधिकारी व समिती सदस्य यांनी संस्थेचे पदाधिकारी म्हणून अथवा समिती सदस्य म्हणून संस्थेचे कोणतेही कामकाज या आदेशाचे दिनांकापासून पाच वर्षापर्यंत करु नये.

सदरचा आदेश आज दिनांक ०५/१२/२०२३ रोजी माझे सही शिक्क्यानिशी दिला असे.

उपनिबंधक सहकारी संस्था पुणे शहर (२) पुणे

(निलम पिंगळे)
उपनिबंधक,
सहकारी संस्था, पुणे शहर (२), पुणे

प्रति,

१. श्रीमती. वेशाली घाग( चेअरमन) ,
२. श्री. गणेश विठ्ठल शिंदे (सचिव) ,
३. श्रीमती. संपदा मिलिंद बोकाडे (खजिनदार),
४. श्री. दादू भिवा सोनवणे (समिती सदस्य ),
५. श्री. रुचिर ओमप्रकाश शर्मा (समिती सदस्य ),
६. श्री. अभिजीत चिटणीस (समिती सदस्य ),
७. श्रीमती. अंजली यशवंत इंगवले (समिती सदस्य),
८. श्रीमती. रुपा नवीन वर्मा (समिती सदस्य),
९. श्री. शादब देशमुख (समिती सदस्य),
१०. श्री. सुनिल नाना तरटे (समिती सदस्य)

सर्व राहणार- स्टेट बॅंक नगर सूस रोड प्रकल्प हो सोसा.१४०/३,सुस रोड, पाषाण, पुणे २१

**प्रत माहितीस्तव-**

१. मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, पुणे विभाग, पुणे
२. मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे
३. शाखाधिकारी, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक मर्या. शाखा
यांना माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीसाठी.